


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २४५ •गुरूवार,दि.०४ डिसेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955


# 'अमरसिंह पंडित यांच्या हत्येचा होता कट'

## गेवराईतील राड्यात जखमी पीएचा खळबळजनक दावा



बीड । प्रतिनिधी

**राज्यातील बहुतांश जिल्ह्यात किरकोळ घटना वगळता नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी शांततेत मतदान पार पडले. मात्र, बीड जिल्ह्यातील गेवराई येथे अमरसिंह पंडित आणि पवार यांच्या समर्थकांमध्ये वाद उफाळल्याचं पाहायला मिळालं. गेवराईतील राड्यात जखमी झालेले माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे स्वीय सहाय्यक अमृत डावखर यांनी रुग्णालयातील अतिदक्षता विभागातून संवाद साधला. यावेळी, गेवराई येथे मतदानादिवशी झालेल्या राड्याबाबत त्यांनी सखोलपणे भाष्य करत भाजप नेते आणि माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या कुटुंबीयांवर गंभीर आरोप करत खळबळजनक दावा केला आहे.**



नगरपालिका निवडणुकी दरम्यान गेवराईमध्ये पंडित विरुद्ध पवार हा संघर्ष पाहायला मिळाला. गेवराई येथील निवडणुकीदरम्यान पवार आणि पंडित कुटुंबातील सदस्य एकमेकांना भिडले. त्यातून मतदानच्या दिवशी मोठा वाद उफाळून आला. या घटनेत माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे स्वीय सहाय्यक अमृत डावखर यांना जबर मारहाण झाली. सध्या त्यांच्यावर बीडमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याच दरम्यान बोलताना डावखर यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या हत्येचा कट पवार कुटुंबाने रचल्याचा खळबळ जनक दावा केला आहे. गेवराईमध्ये मारहाणीची घटना ज्यावेळेस घडली, त्यावेळी मी गेवराईमधील कार्यालयात होतो. याच दरम्यान माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे भाऊ बाळराजे पवार यांच्यासह पाच ते सहा जण तिथे आले, ते सर्वजण अमरसिंह पंडित यांच्या खुनाच्या इराद्याने तिथे आले होते. गुंड प्रवृत्तीचे लोक त्यांच्यासोबत होते, त्यांची गाडी त्यांनी थेट आमच्या कार्यालयावर आदळली. त्यानंतर, तिथे आल्यानंतर अमरसिंह पंडित यांना संपवून टाकायचं असे त्यांनी म्हटलं, ते नाहीत म्हणून मला संपवून टाकू असेही त्यांनी म्हटल्याचा खळबळजनक आरोप डावखर यांनी केला आहे. ▶ उर्वरित पान २ वर

### ● गेवराईत ५५ जणांवर गुन्हा दाखल

**बीडच्या गेवराई नगरपालिका निवडणुकी दरम्यान भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेल्या राडा प्रकरणात गेवराई पोलिसांनी ५५ जणांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. नगरपालिका मतदान प्रक्रिये दरम्यान विद्यमान आमदार विजयसिंह पंडित आणि माजी आमदार लक्ष्मण पवार कुटुंबातील सदस्य एकमेकांमध्ये भिडले होते. त्यामुळे गेवराई शहरात मोठा गोंधळ उडाला होता. या प्रकरणात पोलिसांनी स्वत... फिर्यादी होत ५५ जणांविरोधात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियमांचा उल्लंघन केल्याप्रकरणी बीएनएस १६३ २२३ १८९ इतर कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. यामध्ये पवार आणि पंडित कुटुंबातील सदस्यांचा समावेश आहे. सीसीटीव्ही फुटेच्या आधारे आणखी काही व्यक्तींवर गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सध्या गेवराई पोलीस ठाण्यात सुरू आहे.**

# १ जानेवारी पासुन गेवराईत राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन

## विविध मान्यवरांच्या हस्ते होणार उदघाटन ; कृषीभूषण महेश बेदरे यांची माहिती






गेवराई । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १७ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने स्वर्गीय कृषिरत्न गणेशराव बेदरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या प्रदर्शनाचे आयोजन केले जाते दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नववर्षाच्या सुरुवातीलाच दिनांक ०१ते ०५ जानेवारी दरम्यान किसान कृषी महोत्सव या कृषि प्रदर्शना द्वारे बीड रोड वरील आठ एकर विस्तारणीय दसरा मैदानात भव्य अशा ५ दिवसीय १८ व्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले असल्याची माहिती कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान मराठवाडाभर बीड, जालना, परभणी, हिंगोली सह इतर ठिकाणी या कृषी ▶ उर्वरित पान २ वर

### ● शेतकऱ्यांसाठी हेलिकॉप्टर राइडिंगचे खास आकर्षण ; शेतकरी बसणार हेलिकॉप्टरमध्ये

**गेवराईच्या कृषी प्रदर्शनांत गत २ वर्षापासून शेतकऱ्यांसाठी खास हेलिकॉप्टर राईडचे आयोजन केले यामध्ये शेतकऱ्यांना अल्प दरामध्ये ही हवाई सफर दिली जाणार आहे आपल्या शेतामध्ये राब राब राबणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांना कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून आयोजित केलेल्या हेलिकॉप्टर सफरीचा आनंद घेता येणार आहे या हेलिकॉप्टर राइडिंग मुळे शेतकऱ्यांचे हेलिकॉप्टर मध्ये बसण्याचं स्वप्न प्रतीक्षात पूर्ण होणार आहे.**

### ● AI तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा यावर होणार जनजागृती

**अलीकडच्या काळामध्ये शेती तंत्रज्ञानात शेतकऱ्यांनी आता डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे AI तंत्रज्ञान कसे वापरावे यावर सखोल असे मार्गदर्शन व प्रात्यक्षिक दाखवण्यात येणार आहे त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ऊस शेतीमध्ये AI वापर किती महत्त्वाचा आहे हे या प्रदर्शनाचे यावेळी चे आकर्षण ठरणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांना AI तंत्रज्ञान देण्यामध्ये या कृषी प्रदर्शनाचा महत्त्वाचा वाटा ठरेल**

# केंद्रीय मंत्री अमित शहा यांची आ.सुरेश धस यांनी घेतली भेट

## आष्टी मतदारसंघातील ५० तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी आ.धस यांचा पाठपुरावा



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघातील धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वपूर्ण तीर्थक्षेत्रांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाच्या प्रसाद योजना अंतर्गत विशेषबाब म्हणून निधी मंजूर व्हावा, यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्ली येथील संसद भवनात आमदार सुरेश धस यांनी भेट घेतली. आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यांत असंख्य प्राचीन,ऐतिहासिक व श्रद्धास्थानांची परंपरा व पर्यटन लाभलेली तीर्थक्षेत्रे आहेत.दरवर्षी हजारो भाविक, वारकरी आणि पर्यटक या ठिकाणी भेट देतात. मात्र, अनेक तीर्थस्थळांवर रस्ते, स्वच्छता, पाणी, विश्रामगृहे, प्रकाशयोजना यांसारख्या मूलभूत सुविधांचा ▶ उर्वरित पान २ वर

# एकाच वेळी पोटच्या तीन मुलांना अग्नी, आईचा आक्रोश; 'लेकरं गेली...' बापाचे काळीज चिरणारे शब्द

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील आयटी हब हिंजवडीमध्ये मंगळवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास एक भीषण अपघात झाला आहे. भरधाव आलेल्या एका बसचे नियंत्रण सुटल्याने ती थेट फुटपाथवर चढली. या अपघातात फुटपाथवरून चालणाऱ्या दोन लहानग्या बहीण-भावाचा जागीच मृत्यू झाला आहे. अर्चना देवा प्रसाद आणि सूरज देवा प्रसाद अशी मृत झालेल्या मुलांची नावे आहेत. त्यांचे वय अनुक्रमे आठ आणि सहा वर्षीय बहीण भावांची नाव आहेत.

या अपघातात प्रिया देवा प्रसाद ही १४ वर्षीय तरुणी गंभीर जखमी झाली असून तिचा देखील दुर्दैवी अंत झाला आहे. या अपघातात अविनाश चव्हाण या पादचारी व्यक्तीसह बसमधील काही प्रवासीही जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते वाकड रस्त्यावर हा अपघात घडला.



आयटी कर्मचाऱ्यांची वाहतूक करणारी ही बस होती. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. हिंजवडीतील वाहतूक कोंडी आणि वाढत्या अपघातांवर नागरिकांनी तीव्र चिंता व्यक्त केली असून, हे अपघात कधी थांबणार असा प्रश्न उपस्थित केला आहे. घटनास्थळी हिंजवडी पोलीस पोहचले असून गर्दी हटविण्याचे काम सुरू आहे


हिंजवडी मध्ये मंगळवारी सायंकाळी झालेल्या अपघातामध्ये मृतांची संख्या वाढली असून तिसरी बहीण देखील उपचारादरम्यान मरण पावली आहे. प्रिय देवा प्रसाद अस मरण पावलेल्या तिसऱ्या १४ वर्षीय बहिणीचे नाव आहे. हिंजवडीमध्ये काल सायंकाळी साडे सहाच्या सुमाराला आय टी कर्मचाऱ्यांना सोडणाऱ्या बसचं नियंत्रण सुटून फुटपाथ वर चढत झालेल्या ▶ उर्वरित पान २ वर




## ट्रक्टर अंगावरून गेल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथिल शेतकरी मिठु रामभाऊ येवले वय ४९ यांचा ट्रॅक्टर वरुन पडुन मोठे चाक छातीवरुन गेल्याने गंभीर अपघातात मृत्यू झाल्याने डोंगरकिन्ही परिसरात हळहळ व्यक्त आहे. स्व मिठु येवले हे डोंगरकिन्ही येथिल बसस्थानकावरील येवले हॉटेलचे मालक मिठुकाका म्हणून परिचित होते. छोटे व्यवसायिक असताना शेती व्यवसाय करित होते.शेतातील पिकाला पाणी देण्यासाठी मोटार चालु होती.रात्रीचे पाणी देण्यासाठी बिबट्याच्या भितीने धजावत नाहीत.मोटार बंद करण्यासाठी बिबट्याची भिती असल्याने पायी न जाता टॅक्टर घेऊन चालले असताना मिठुकाका येवले हे अचानकपणे खाली पडले व चालु टॅक्ट्रर छातीवर गेले.तात्काळ बीड येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले मात्र त्यांची प्राणज्योत मालवली.बिबट्याच्या भितीने व लाईटच्या ये जा मुळे शेतकरी अपघातात मृत्यू होत आहेत.मिठुकाका यांच्या पश्चात दोन मुले,तीन भाऊ,भावजयी, पत्नी असा परिवार आहे.सोसायटीचे व्हा चेअरमन प्रभाकर येवले फौजी यांचे भाऊ तर अहिल्यानगर पोलिस दलातील पोलिस आसाराम येवले यांचे वडील आहेत.






# दत्त जयंतीची तारीख, पूजा, तिथी, शुभ मुहूर्त आणि उपवासाची महत्त्वाची माहिती

महाराष्ट्रासह देशभरात दत्त जयंतीचा उत्सव जल्लोषात साजरा केला जातो. मार्गशीर्ष महिन्याच्या पौर्णिमा तिथीला दत्त जयंती साजरी केली जाते. ब्रह्मा, विष्णू आणि शिवशंकर यांचे एकत्रित रूप म्हणजे दत्तगुरूंचा अवतार. त्यामुळे दत्तात्रेयांची पूजा केल्यास त्रिमूर्तींची पूजा केल्याचे पुण्य मिळते, अशी मान्यता आहे. यंदा दत्त जयंती कधी आहे, तिथी कालावधी, शुभ मुहूर्तासह अन्य माहिती जाणून घेऊया...

दत्तात्रेय जयंती २०२५ तिथी कालावधी ।– दत्तात्रेय जयंती २०२५ तिथी प्रारंभ वेळ : ४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८.३७ वाजता दत्तात्रेय जयंती २०२५ तिथी समाप्त वेळ : ५ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ४.४३ वाजता

तिथीनुसार यंदा ४ डिसेंबर रोजी दत्त जयंती साजरी केली जाईल.

दत्त जयंती शुभ मुहूर्त – काही ठिकाणी दत्तजन्मोत्सव दुपारी १२.३९ वाजता तर काही ठिकाणी संध्याकाळी ६ वाजता साजरा केला जातो .

मार्गशीर्ष पौर्णिमेच्याच दिवशी दत्त जयंती का साजरी केली जाते ? मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी संध्याकाळी दत्तगुरूंचा जन्म झाला होता, म्हणून याच तिथीला दत्तांचा जन्मोत्सव साजरा केला जातो. भूतलावर स्थूल आणि सूक्ष्म रूपांत असुरी शक्ती मोठ्या प्रमाणावर वाढल्या होत्या, त्यांना दैत्य म्हटले जात असे. देवगणांनी त्या असुरी शक्तींना नष्ट करण्यासाठी केलेले प्रयत्न अपयश आले. तेव्हा ब्रह्मदेवांच्या आदेशानुसार विविध ठिकाणी विविध रूपांत दत्तदेवतेला अवतार घ्यावा लागला. यानंतर दैत्यांचा खात्मा झाला, म्हणूनच हा दिवस दत्तजयंती म्हणून साजरा केला जातो.



दत्त जयंतीचे महत्त्व – दत्त जयंतीला दत्ततत्त्व हे पृथ्वीतलावर नेहमीच्या तुलनेत एक हजार पटीने कार्यरत असतात. या दिवशी दत्ताची मनोभावे उपासना केल्यास दत्त तत्त्वाचा अधिकाअधिक लाभ मिळण्यास मदत होते.

दत्त जयंतीचा उपवास कसा करावा ? – एकादशीप्रमाणे दत्त जयंतीचा उपवास करावा.फराळाचा नैवेद्य दत्तगुरुंना अर्पण करावा.दत्त जयंतीच्या दिवशी गुरुचरित्रातील अवर्तिनिका, चौथा अध्याय, दत्त जन्मोत्सव कथा वाचावी. दत्त महाराजांच्या दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा या मंत्राचा जप करावा. दिवसभर नास्मरण करा.घराजवळील दत्त मंदिरात जावे, दत्तगुरुंना पिवळ्या रंगाची फुलं, पिवळ्या रंगाचे वस्त्र अर्पण करावे. शक्य असल्यास औदुंबर वृक्षास प्रदक्षिणा घालावी.उपवासाचे पारण दुसऱ्या दिवशी करावे.

दत्तगुरूंचा जन्मोत्सव कसा साजरा करावा ? – दत्त जयंती साजरी करण्याशी संबंधित शास्त्रोक्त असा विशिष्ट विधी आढळून येत नाही. या उत्सवापूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे, यालाच 'गुरुचरित्रसप्ताह' असे म्हणतात. दत्त मंदिरामध्ये भजन, कीर्तन इत्यादी कार्यक्रम आयोजित केले जातात. पण घरामध्ये दत्त जन्मोत्सव साजरा करावा.

घरामध्ये चौरंगावर स्वच्छ वस्त्र अंथरावे.चौरंगावर दत्तगुरूंची प्रतिमा किंवा मूर्ती स्थापित करावी.षोडषोपचार पूजा करावी. दत्तांचा नामजप आणि प्रार्थना करावी.संध्याकाळी दत्त स्तोत्राचे पठण करावे.दत्त तत्त्व आकृष्ट आणि प्रक्षेपित करणाऱ्या रांगोळी काढा. दत्तगुरूंची पूजा, धूप, दीप आणि आरती करून सुंठवड्याच्या प्रसादाचे वाटप करावे. श्री दत्त गुरूंबाबतची महत्त्वाची माहिती– श्री दत्त संप्रदायातील साधक अवधूतचिंतन श्री गुरूदेव दत्त असा जयघोष करत असतात. अवधूत हे दत्तात्रेयांचे नाव असून या शब्दाचा अर्थ म्हणजे नेहमी आनंदात रमणारा, प्रत्येक क्षण वर्तमानकाळात जगणारा होय. दत्तांच्या हातातील कमंडलू आणि जपमाळ ब्रह्मदेवाचे प्रतीक आहे. शंख आणि चक्र भगवान विष्णूचे तर त्रिशूळ आणि डमरू शिवशंकराचे प्रतीक आहे. दत्तांच्या पाठीमागे असलेली गाय म्हणजे पृथ्वी आणि चार श्वान म्हणजे चार वेदांचे प्रतीक आहे. दत्तगुरूंनी पृथ्वीला आपले गुरू मानले होते. पृथ्वीप्रमाणे सहनशील आणि सहिष्णु असावे, अशी तिच्याकडून त्यांनी शिकवण घेतली होती. अग्नीला गुरु मानून आपला देह हा क्षणभंगूर आहे, अशी शिकवण त्यांनी अग्नीच्या ज्वालेपासून घेतली होती. अशाप्रकारे चराचरातील प्रत्येक वस्तूत परमेश्वराचे अस्तित्व आहे. ते पाहण्यासाठी श्रीदत्तगुरूंनी चोवीस गुरू केले होते.महाराष्ट्रामध्ये औदुंबर, नरसोबाची वाडी, गाणगापूर इत्यादी दत्तक्षेत्रांत या उत्सवास विशेष महत्त्व असते.

## दत्त व दत्तात्रेय या दत्तगुरूंच्या नावाचा अर्थ तुम्हाला माहित आहे का? जाणून घ्या दत्त महाराजांच्या नावाचा उलगडा...!

त्रिगुण अवतार दत्तात्रेय महाराजांची पूजा भक्तगण गुरुरूपात करतात. दत्तमहाराजांना गुरु मानून त्यांची सेवा,पारायण दान पुण्य करुन दत्तगुरूंची कृपा भक्त मिळवतात. मात्र तुम्हाला दत्त या नावाचा अर्थ किंवा दत्तगुरुंना दत्तात्रेय का म्हणतात हे माहित आहे का ? आज आपण दत्त महाराजांच्या नावाचा उलगडा करूयात.

दत्त महाराजांचा जन्म मार्गशीर्ष पौर्णिमेला प्रदोषकाळात झाला होता. त्यामुळे दरवर्षी मार्गशीर्ष पौर्णिमेला दत्तजयंतीमोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. यादिवशी भक्त दत्तमहाराजांची मनोभावे पूजा करतात. अनेक दत्त मंदिरात होम हवन दत्त महाराजांची पालखी निघते तसेच पाळणा देखील हलवला जातो. तर अनेकठिकाणी यादिवशी अन्नदान व महाप्रसादाचे आयोजन केले जाते. दत्त महाराजांना गुरुत्वाचे प्रतीक मानले जाते. गुरु मानून त्यांची सेवा करण्यात येते. म्हणूनच दत्ताना दत्तगुरु असे म्हणतात. मात्र त्यांच्या दत्त या नावाचा अर्थ काय आहे हे अनेकांना माहित नाही. तसेच दत्त महाराजांना दत्तात्रेय का म्हणतात यामागे देखील विशेष कारण आहे. चला तर मग दत्तगुरूंच्या नावाचा अर्थ काय ते पाहुयात.





अनुसया पुत्र दत्तगुरु– माता अनुसूया आणि ब्रम्हदेवाचे मानसपुत्र अत्री ऋषी यांनी पुत्रप्राप्तीसाठी कठोर तपश्चर्या केली होती. त्याच्या तपश्चर्येतून देवगण प्रसन्न झाले व ब्रम्हा विष्णू आणि महेश या त्रिमूर्तींनी त्रिगुण रूपात माता अनुसूयेच्या पोटी जन्म घेतला. त्यामुळे दत्तगुरूंना त्रिगुण अवतार म्हंटले जाते. ते साक्षात महादेव, विष्णू व ब्रम्हदेव यांचे अंश आहेत. अशारितीने दत्तगुरुंचा जन्म झाला.

दत्त नावाचा अर्थ– दत्त या नावाचा अर्थ आहे दान करणे. एखादी वस्तू देणे. देवाने दान केलेला किंवा साक्षात ईश्वराने दिलेली गोष्ट म्हणजे दत्त होय. आपण अनेकदा ऐकतो संतान दत्तक घेणे. याचा अर्थ कोणाकडून तरी ती गोष्ट घेणे किंवा कोणी आपल्या पदरी दान करणे. माता अनुसयेला त्रिमूर्तीकडून मिळालेली भेट म्हणजे दत्त होय. दत्तात्रेय नावाचा अर्थ दत्त म्हणजे दिलेला किंवा दान केलेला. मात्र साक्षात ब्रम्हा विष्णू आणि महेश या त्रिमूर्तींनी दिलेला पुत्र म्हणजे दत्त होय. माता अनुसया आणि अत्री ऋषी यांच्या भक्तीने प्रसन्न होऊन त्रिमूर्तींनी पुत्र रूपात अनुसया मातेच्या पोटी जन्म घेतला.

◆ पान १ वरून पुढे...

### 'अमरसिंह पंडित...

तसेच, काठी, बेल्ट, लाथ्या, बुक्याने मला मारहाण केली, असेही त्यांनी सांगितले. पवारांनी १९९७ मध्ये तत्कालीन शिवसेना तालुकाप्रमुखाचा खून केला होता, याच प्रकरणात त्यांनी १४ वर्षे तुरुंगात शिक्षा भोगली, सध्या शिक्षा भोगून ते बाहेर आले आहेत. बाहेर आल्यानंतर त्यांचे वर्तन गैर आहे, काल मला बचाव करण्याची संधी दिली नाही. मला त्यांनी जिवंत मारलं असते, पण आमचा ड्रायव्हर मध्ये आला. आणखी इतर काही जण जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिस जबाब घेतील, या लोकांची जागा कारागृहात आहे. माझा संबंध नसताना मला मारहाण करण्यात आली, केवळ मतदान केंद्रावर बाचाबाची झाली आणि हा वाद उफाळून आल्याची माहिती अमृत डावखर यांनी दिली.

### १ जानेवारी पासुन...

प्रदर्शनाचे आयोजन करते बीड जिल्ह्यातील शेतकर्यांच्या आग्रहाने पुन्हा या प्रदर्शनाचे आयोजन स्वर्गीय कृषिरत्न गणेश बेदरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रदर्शनाचे आयोजन केले असून प्रकल्प संचालक आत्मा ,महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी , महाएपीएसी फेडरेशन, ओंकार साखर कारखाना ग्रुप यांचा यात विशेष सहभाग प्रदर्शनात असणार आहे. कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात द्वारे तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहे १ दिवसीय पशुप्रदर्शन तज्ज्ञांची चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार आहे विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्धाटन व समारोप प्रसंगी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा या शेतकयांचा गौरव करण्यात येणार आहे या प्रदर्शनाचा गेवराई शहरासह जिल्ह्यातील

◆ पान १ वरून पुढे...

शेतकर्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने कृषिभूषण महेश बेदरे यानी केले आहे.

### केंद्रीय मंत्री...

अभाव असल्याने त्यांचा अपेक्षित विकास झालेला नाही.ही बाब लक्षात घेऊन प्रसाद योजना (तीर्थयात्रा पुनरुज्जीवन आणि आध्यात्मिक संवर्धन मोहीम) अंतर्गत आष्टी मतदारसंघातील सुमारे ५० तीर्थक्षेत्रे व पर्यटन स्थळांना निधी उपलब्ध करून देण्याची ठाम मागणी आ.धस यांनी केली. याबाबत संबंधित विभागाकडून तातडीने कार्यवाही करावी, अशी विनंतीही आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्याकडे यावेळी केली. या निधीमुळे तीर्थस्थळांचा सर्वांगीण विकास होऊन भक्तांसाठी सुविधा वाढतील, धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार असल्याने मतदारसंघातील भाविकांनी आभार मानले आहेत.

### एकाच वेळी...

अपघातात ८ वर्षीय अर्चना देवा प्रसाद आणि ६ वर्षीय सुरज देवा प्रसाद या बहीण भावांचा मृत्यू झाला होता. उपचारा दरम्यान तिसरी बहीण प्रिया देवा प्रसाद हिचा ही उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. दरम्यान हिंजवडी पोलिसांनी मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवणाऱ्या नागनाथ गुजर या चालकाला अटक केली असून गाडी पुरवणारा वेंडर मॅनेजर भाऊसाहेब घोलप अटक केली आहे. तीनही भावंडे एकाच कुटुंबातील असून एकमेकांच्या शेजारीच त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. याप्रसंगी बापाचे शब्द उपस्थितीतांचं काळीज पिळवटणारं होतं. माझी लेकरं म्हणत बापाने अंत्यविधीकरुन टाहो फोडला. पतीने मुलांना अग्नी देताच आईने हंबरडा फोडला. एका क्षणात होत्याचं नव्हतं झालं अन् पोटची मुलं गेली.

◆ पान ४ वरून पुढे...

### केज, अंबाजोगाई....

होणाऱ्या ऊसाला पहिली उचल विनाकपात २८००/–रुपये देण्याचे मान्य करत चक्काजाम आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली.व अंतिम ऊस दर रेव्हेन्यू शेअरिंग फॉर्मुल्यानुसार (ठडऋ)देण्याचे निश्चित केले. यावर सर्व शेतकऱ्यांनी एकमत करून चक्काजाम आंदोलन स्थगित केले आज सायंकाळपर्यंत सर्व कारखान्यांनी लेखी पत्र देण्याचे मान्य केले आहे जर त्यांनी लेखी पत्र दिले नाही तर पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसू असा निर्वाणीचा इशारा देखील आंदोलकानी दिला आहे.

### फुस लावुन....

आष्टी तहसीलदार यांना मुलीची आई आशाबाई पठारे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि १५ ऑक्टोबर २०२५ रोजी पोलीस स्टेशन अंभोरा यांच्या हलगर्जी पणाला कंटाळून उपोषणाचा अर्ज केला होता. परंतु तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक तावरे यांनी आमच्याकडून १५ दिवसाची मुदत मागितली होती. त्या कारणास्तव आम्ही उपोषण पुढे ढकले होते. त्यानंतर आम्ही वारंवार त्यांच्याशी संपर्क करून प्रत्यक्ष भेटून माझी मुलगी हिचा शोध का लागला नाही अशी विचारणा केली असता आम्हाला उडवा उडवीचे उतरे दिले. माझा भाऊ आजिनाथ आल्हाडे व तपास अधिकारी सोबत कल्याण येथे माझ्या मुलीचा शोध घेण्यासाठी गेले असता, कुठली ही ठोस कारवाई केली नाही व ज्या व्यक्तीने आरोपीला आश्रय दिला त्याला सही सलामत सोडून दिले व आरोपी शैलेश सतीश आटोळे याला तेथून जाण्यासाठी वाट मोकळी करून दिली. मी पोलीस अधीक्षक बीड यांना प्रत्यक्ष भेटून सदर घटनेची माहिती दिली व तपास जलद गतीने होण्यासाठी व आरोपीला लवकर अटक व्हावी म्हणून निवेदन दिले होते. परंतु त्याचाही काही उपयोग झाला नाही. सदर प्रकरणांमध्ये १ सतीस आटोळे (मुलाचे वडील) २. संजय गाढवे (मुलाचे मामा) ३.रमेश गावडे ४. राहुल राठोड यांचा हस्तक्षेपामुळे पोलीस यंत्रणांवर दबाव टाकत आहेत. आरोपी यांचे नातेवाईक आम्हाला त्रास देतात. पोलीस स्टेशनला गेले असता आरोपीचे नातेवाईक तेथे येतात व तुम्हाला तुमची मुलगी मिळणार नाही. तिचा नाद सोडून दे म्हणत माझी व माझ्या मुलीची निंदा करतात. मला कोणाचाही आधार नाही, आरोपीचे नातेवाईक व पोलीस स्टेशन अंभोरा यांना वैतागून त्यामुळे तहसील कार्यालय आष्टी येथे आमरण उपोषणाला बसले आहे जो पोलीस मुलीचा शोध घेत नाही तोपर्यंत उपोषण सुरू ठेवणार असल्याचा इशारा मुलीच्या आईने दिला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### ऊसाला प्रतिटन...

कारखान्यानी प्रतीटन ४०००/– भाव जाहीर केलेला नाही. त्यामुळे शेतकरी समीतीच्या वतीने आंदोलन चालु आहे. त्यामुळे प्रतीटन ४०००/– रुपये भाव जाहीर करावा अन्यथा समाजवादी पार्टी च्या वतीने अंदोलन करण्यात येईल असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर समाजवादी पार्टी महाराष्ट्र प्रदेश चे प्रदेश तथा चर्मकार सेल प्रदेशाध्यक्ष एडवोकेट शिवाजीराव कांबळे, समाजवादी पार्टी बीड जिल्हा महिला आघाडी अध्यक्षा सालेहा जिलानी, शहराध्यक्ष राजेश परदेशी, तालुका अध्यक्ष शेख जिलानी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### बार्टीच्या वतीने...

अधिकारी योगेश सोनवणे साहेब. इत्यादी बीड तालुक्यातील समतादूत भिमा कानधरे यांनी आज नारदस्वामी माध्यमिक विद्यालय MIDC येथे बार्टीच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक सीरसट सर यांनी केले अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक श्री.पाखरे एस. एस सर यांनी मार्गदर्शन केले व बार्टीचे प्रमुख पाहुणे म्हणून समतादूत भिमा कानधरे सर यांनी संविधान विषयी मार्गदर्शन करून संविधानातील मूल्याची माहिती पाचवी ते दहावी च्या विद्यार्थ्यांना एक एक करून माहिती देण्यात आली यामध्ये सर्वांचे उद्देशिका वाचन घेण्यात आले. कार्यक्रमास श्रीमती. खवले एम.एम, श्रीमती. दावेकर.टी.सी,श्री. साखरे आर. टी, श्री. जाधव.व्हि.ए. सर व सर्व शिक्षक शिक्षिका उपस्थित होते सिरसाट सर यांनी आभार व्यक्त केले.

### दिव्यांगाचे सामाजिक,...

(वैद्यकीय अधिकारी) यांनी दिव्यांगांसाठी प्रचलित कायदे व त्यातील विविध तरतुदी बाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रमुख उद्धाटक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी आपल्या भाषणमध्ये दिव्यांगाचे सामाजिक, शैक्षणिक व अर्थिक हितासाठी शासकीय योजनांची काटेकोरपणे अमलबजावणी करणार असल्याचे नमुद केले. शिवाय दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव आदरणिय मुंडे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग विभाग प्रगती करत असल्याचे नमुद केले. शिवाय दिव्यांग बांधवांसाठी बस पास सवलत, युडीआयडी कार्ड, बीज भांडवल योजना, दिव्यांग अव्यंग विवाह योजना, ५% दिव्यांग कल्याण निधी इ. शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविणार असल्याचे नमुद केले. बीड जिल्ह्यामध्ये दिव्यांगना आयुष्यमान भारत कार्ड, युडीआयडी कार्ड तसेच जिल्हा परिषद

◆ पान ४ वरून पुढे...

अंतर्गत इमारतींना सुगम्य करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही चालु असल्याचे सांगीतले. सदर कार्यक्रमासाठी अशोक आठवले, महादेव सरवदे, शिला उजगरे, विक्रम मोमिन, श्री. पालवे, श्री. शाहु डोळस, तत्वशिल कांबळे, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नियोजन श्री. नखाते ए. बी. समाज कल्याण निरीक्षक यांनी केले. सुत्रसंचलन श्री. अलोक कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. अशोक चव्हाण यांनी केले. राष्ट्रगीतानी कार्यक्रमाची सांगता झाली.

### लिंबागणेश ग्रामपंचायत....

लहु घोलप, अभिजित तागड,केशव गिरे,किरण लगास, महावीर मुळे, बालाजी मुळे, सिताराम थोरात, ग्रामपंचायत कर्मचारी जिवन मुळे, सुखदेव वाणी आदी मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी तर आभारप्रदर्शन पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी केले. या प्रसंगी चक्रवर्ती महाराजा यशवंतराव होळकर यांचा जीवनपट उलगडताना डॉ. गणेश ढवळे म्हणाले की, ब्रिटिश सत्तेला आव्हान देणारे, ब्रिटिशांचा कर्दनकाळ ठरलेले आणि भारताचा नेपोलियन म्हणून इतिहासात ओळखले जाणारे हे यशवंतराव महाराज भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील तेजस्वी व्यक्तिमत्व होते. वयाच्या केवळ १९व्या वर्षी वडील तुकोजीराव होळकर यांच्या सोबत १० हजार सैन्यासह १७९५ मधील खर्ड्याच्या लढाईत निजामांचा पराभव करून त्यांनी पराक्रमाची पहिली छाप उमटवली. पुढे त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध सलग १८ युद्धे लढून एकही युद्ध न हरता इंग्रजांना धुळ चारली. इंग्रजांना सळो की पळो करून सोडणारे आणि जगाच्या इतिहासात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारे हे एकमेव अपराजित महाराजा होते, असे गौरवोद्गार डॉ. ढवळे यांनी काढले.

### शेतकऱ्यांच्या...

झाले त्यामुळे तहसीलदार साहेब यांच्या मदतीने आजचे आमरण उपोषण निवेदन देऊन स्थगित केले तरी शेतकऱ्यांना पहिली उचल २८०० रुपये येडेश्वरी कारखान्याने शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली येडेश्वरी कारखान्याने ३००० रुपये पूर्ण करू असा शब्द दिल्यानंतर आज तीन डिसेंबर २०२५ रोजीचे आमरण उपोषण निवेदन देऊन स्थगित करण्यात आले आहे यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे मराठवाडा संपर्कप्रमुख अण्णासाहेब जाधव अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रोहन गलांडे पाटील सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब सोनवणे भाई सुमंत अण्णा उंबरे सर्व संघटनेचे पदाधिकारी, शेतकरी वर्ग उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

### पात्र व्यक्तींनी इस्राईलला...

१. इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे (वाचन, लेखन आणि बोलणे). २. किमान शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण, ३. वय वर्षे २५ ते ५० वयोगटाचे उमेदवार या योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत. ४. किमान आवश्यक अनुभव किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक नूतनीकरणाच्या अंतर्गत कामात तज्ज्ञ असणे आवश्यक आहे. ५. नोकरीचे स्थान – इस्रायलमध्ये कुठेही. अधिकाधिक संख्येने इच्छुक पात्र व्यक्तींनी इस्राईलला जाण्यासाठी https://maharashtrainternational.com या संकेत स्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन कौशल्य विकास अधिकारी स. आ. किरवले यांनी केले आहे.

### उसाचा दर...

पहिला हप्ता, सुंदरराव सोळुंके कारखाना तेलगाव, जय महेश कारखाना २७७५ रु छत्रपती कारखाना २७५० रु देण्यास तयार झाले. त्यांचे आभार बीड तालुक्यातील गुळ उद्योग यांनी आपले दर जाहीर करण्यात यावेत. या कडे शेतकऱ्याचे लक्ष केंद्रित झाले आहे. या वेळी बीड तालुक्यात पिंपळनेर परिसरात राजेंद्र आमटे, राजू वीर, शेतकरी पुत्र धनंजय गुंदेकर,मुगगाव येथील तुकाराम दुबाले, भागवत (हानुमान) दुबाले, आण्णासाहेब दुबाले व जिजाभाऊ दुबाले तसेच बेडकुचीवाडी येथील शेतकरी रूपांगत जाधव, अशोक काशीद, माऊली जाधव, गणेश चिंचकर सांडरवन येथील शेतकरी पवनराजे दुबाले, राजेंद्र धुरवडे, लिंबरूई देवी येथील शेतकरी बालासाहेब पैठणे, सुभाषराव नांदे, अमोल दुबाले व बंडु मात्रे, पाटेगाव येथील शेतकरी गोविंद कदम, वचिष्ट वाघ, विजयराजे कदम व सोमनाथ कदम पिंपळादेवी येथील शेतकरी प्रदीपराव घुमरे, शुरेश दादा घुमरे, बालाप्रसाद आवारे, विशाल घुमरे, रंजेगाव येथील शेतकरी विलासराव आबुज, मुकुंद आबुज, युवराज आबुज, दिलीप आबुज आणि धनंजय आबुज , आहेर चिंचोली राकटे या सर्व शेतकरी बांधवांची मोलाची साथ मिळाल्याने आंदोलन यशस्वी झाले आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर...

६९ व्या महापरिनिर्वाण दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास अभिवादन करून त्या ठिकाणी योग्य ते शालेय साहित्य किंवा आर्थिक दान करावे असे नम्र आवाहन महामानव अभिवादन ग्रुप बीड तर्फे करण्यात येत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांगांचा सत्कार



छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत तापडीया नाट्यगृह निराला बाजार येथे दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेल्या दिव्यांगांचा तसेच दिव्यांग कल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास, अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त दीपक खरात, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी बाबासाहेब अरवत आदी मान्यवर उपस्थित होते. दिव्यांग कल्याण विभागाचा परिचय, दिव्यांग कल्याणासाठी शासकीय योजना, विभागाचे धोरण, कायदे, नियम, दिव्यांग प्रतिबंधात्मक उपाय याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था तसेच राज्यस्तरावर क्रीडा स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळविणारे खेळाडू यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले. त्यास जिल्ह्यातील दिव्यांगाच्या विशेष शाळा, कार्यशाळा येथील मुख्याध्यापक व कर्मचारी यांनी कार्यक्रमास सहकार्य केले. मुख्याध्यापक कैलास निकम यांनी सूत्रसंचालन केले. यामिनी काळे यांनी आभार मानले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने १ लाख दिव्यांगांना कृत्रिम अवयव वितरण

## दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने आयुष्य जगण्यासाठी शासनाचे सर्वतोपरी प्रयत्न

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने आयुष्य जगण्यासाठी सर्व सुविधा मिळवून देण्याकरिता शासनाचे सर्वतोपरी प्रयत्न आहेत. समाजातील सर्व घटकांना समान संधी उपलब्ध करून देण्याचे शासनाचे ध्येय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने व रतननिधी फाऊंडेशनतर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यक साधन वितरण शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. या उपक्रमाद्वारे १ लाख दिव्यांग व्यक्तींना लाभ देण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले असून, हा अभिनव प्रकल्प दिव्यांग पुनर्वसनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील असून, स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने त्यासाठी अधिक प्रभावी कार्यवाही केली जात आहे . या उपक्रमाचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी बनवणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करणे हा आहे. कृत्रिम हात, पाय, श्रवणयंत्रे, व्हीलचेअर्स आणि इतर सहाय्यक उपकरणे यांचा समावेश असलेला हा वितरण कार्यक्रम राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे. रतननिधी फाऊंडेशनने राज्यातील बीड, चंद्रपूर, जळगाव, सोलापूर, पालघर, मुंबई, गडचिरोली, पुणे, सातारा, कोल्हापूर, रायगड, लातूर, नांदेड, यवतमाळ, अकोला, परभणी, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव आणि ठाणे या जिल्ह्यांमध्ये २९,४९६ सहाय्यक साधनांचे (जयपूर फूट, पोलिओ कॅलिपर्स, कृत्रिम हात व काठी) वितरण करून सुमारे २६ हजार दिव्यांग व्यक्तींचे पुनर्वसन केले आहे. जागतिक स्तरावर सुमारे १५ टक्के लोकसंख्या दिव्यांग आहे, तर भारतात हा आकडा सुमारे २.२ टक्के आहे. या पार्श्वभूमीवर रतननिधी फाऊंडेशनचा मोबिलिटी प्रकल्प दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने आयुष्य जगण्याची उर्मी देणारा, आत्मविश्वास मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

# राजिप वडगाव शाळेला राज्य समन्वयकांची सदिच्छा भेट शाळेचे कौतुक व विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन



**शाळेतील विद्यार्थ्यांना तज्ञ लोकांचे मार्गदर्शन मिळणे फार गरजेचे आहे असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना शैक्षणिक व बौद्धिक विकासासाठी चालना देणारे असते व सर फाउंडेशन सारख्या माध्यमातून शैक्षणिक उठावासाठी अनेक उपक्रम राबवले जातात त्यांचे महाराष्ट्रातील नेतृत्त्वाने शाळेला भेट दिली ही विद्यार्थ्यांसाठी एक ज्ञानाची पर्वणीच होती सरांचे मन:पूर्वक आभार. – सुभाष राठोड, मुख्याध्यापक शाळा वडगाव**

रायगड । प्रतिनिधी

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव ता.खालापूर जि.रायगड येथे सर फाउंडेशन महाराष्ट्राचे राज्य समन्वयक बाळासाहेब वाघ व सिद्धाराम माशाळे सर यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी शाळेतर्फे त्यांचे स्वागत गीत व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिशा नवोपक्रमाची या पुस्तकाचे लेखक सिद्धाराम माशाळे सर यांनी शाळेत सर्वांचे योगदान व भूमिका कशी महत्त्वाची आहे,हे विद्यार्थी व शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांना समजावून सांगितले तसेच सर फाउंडेशन महाराष्ट्र अंतर्गत चालणारे विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली.तसेच बाळासाहेब वाघ सरांनी विद्यार्थ्यांना यश, स्पर्धा व मेहनत याविषयी मार्गदर्शन करताना शाळेने अल्पकालावधीत मिळविलेल्या शैक्षणिक यशाबद्दल कौतुक करत विद्यार्थी शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे अभिनंदन केले. शाळेच्या परिसरात मिळणारा आल्हाददायक वातावरण व आनंदी वातावरण तसेच शैक्षणिक दृष्ट्या पूरक वातावरण निर्मिती विविध उपक्रम,गणित ,भाषा व विज्ञान प्रयोगशाळा,संगणक कक्ष,विज्ञान प्रयोगशाळा, रीडिंग गार्डन व परसबाग तसेच औषधी वनस्पती कोपरा हे सर्व पाहून दोघांनीही विद्यार्थी,शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीच्या कार्याचे कौतुक केले. या छोटेखानी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैजनाथ जाधव सर यांनी केले. सदर प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ राजश्री जांभुळकर, शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड, सहशिक्षक वैजनाथ जाधव, स्वयंसेवक संकेत काठोळे, संचिता गडगे व पालक उपस्थित होते

## ०५–औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध

# विभागात एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदार



छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. सदर सुधारीत कार्यक्रमानुसार मतदारयादीच्या प्रारूप प्रसिध्दीचा दिनांक ०३ डिसेंबर, २०२५ (बुधवार) होता. त्यानुसार प्रारुप मतदार यादी आज प्रसिध्द करण्यात आली.

विभागीय आयुक्त कार्यालयात या कार्यक्रमावेळी विभागीय आयुक्त तथा ०५–औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ मतदार नोंदणी अधिकारी जितेंद्र पापळकर, अपर आयुक्त सामान्य प्रशासन तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी श्रीमती मंजुषा मिसकर यांच्यासह तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण ४६ हजार ४०६ पुरूष, १५ हजार ९०८ महिला व ४ तृतीयपंथी असे एकूण ६२ हजार ३१८ मतदार आहेत. जालना जिल्ह्यात एकूण २३ हजार ६४८ पुरूष, ५ हजार २७२ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण २८ हजार ९२२ मतदार आहेत. परभणी जिल्ह्यात १६ हजार ६३५ पुरूष, ४ हजार ६४ महिला तर १ तृतीयपंथी असे एकूण २० हजार ७०० मतदार आहेत. हिंगोली जिल्ह्यात ६ हजार ४७६ पुरूष, १ हजार ५२८ महिला असे एकूण ६ हजार ४ मतदार आहेत. नांदेड जिल्ह्यात २३ हजार ८६७ पुरूष, ६ हजार २६४ महिला तर ४ तृतीयपंथी असे एकूण ३० हजार १३५ मतदार आहेत. लातूर जिल्ह्यात १७ हजार ४९२ पुरूष, ४ हजार ९९३ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण २२ हजार ४८७ मतदार आहे. धाराशिव जिल्ह्यात १६ हजार ७६२ पुरूष, ४ हजार ४७ महिला असे एकूण २० हजार ८०९ मतदार आहेत. बीड जिल्ह्यात ३४ हजार ४८५ पुरूष, ९ हजार ६८७ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण ४७ हजार १७४ मतदार आहेत.

# ३ दिवस समुद्राला मोठी भरती; उंच लाटा... दादरला चैत्यभूमीवर जाणाऱ्या अनुयायांना खबरदारी घेण्याचे आवाहन

मुंबई । प्रतिनिधी

४ ते ७ डिसेंबर २०२५ दरम्यान सलग ३ दिवस समुद्राला मोठी भरती येणार आहे. या भरती दरम्यान समुद्रामध्ये साडेचार मीटरपेक्षा अधिक उंचीच्या लाटा उसळणार आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागामार्फत मोठ्या भरतीचा तपशिल जाहीर करण्यात आला आहे. ६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन असतो. यानिमित्ताने दादर चैत्यभूमीवर बाबासाहेबांच्या अनुयायांची मोठी गर्दी होते. दादरला चैत्यभूमीवर जाणाऱ्या अनुयायांना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




मुंबई महापालिकेने भरतीचा दिनांक व वेळ यासह भरती दरम्यान समुद्रात उसळणा-या लाटांची उंचीदेखील जाहीर केली आहे. दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी मध्यरात्री १२ वाजून ३९ मिनिटांनी ५.०३ उंचीच्या लाटा उसळणार आहेत. मोठी भरती असण्याच्या सर्व दिवशी भरती कालावधीदरम्यान नागरिकांनी समुद्रकिना-या नजीक जावू नये, तसेच या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे मुंबई पोलिसांद्वारे वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाद्वारे नागरिकांना करण्यात येत आहे. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमी आणि छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क) येथे येणाऱ्या अनुयायांनीदेखील समुद्रकिनारी योग्य खबरदारी बाळगावी असे आवाहन केले आहे.

वरीलनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाद्वारे कळविण्यात आलेला मोठ्या भरतींचा तपशिल खालीलप्रमाणे

१. गुरुवार, दि. ४ – १२ – २०२५ – रात्री – ११:५२ वा.– लाटांची उंची – ४.९६ मीटर

२. शुक्रवार, दि. ५ – १२ – २०२५ सकाळी – ११:३० वा.– लाटांची उंची – ४.१४ मीटर

३. शनिवार, दि. ६ – १२ – २०२५ –मध्यरात्री – १२.३९ वा.–लाटांची उंची – ५.०३ मीटर

४. शनिवार, दि. ६ – १२ – २०२५ –दुपारी – १२.२० वा.– लाटांची उंची – ४.१७ मीटर

५. रविवार, दि. ७ – १२ – २०२५ –मध्यरात्री –१.२७ वा. लाटांची उंची – ५.०१ मीटर

६. रविवार, दि. ७– १२ – २०२५ –दुपारी – १.१० वा. लाटांची उंची – ४.१५ मीटर

## राज्यात येत्या ४८ तासात तीव्र थंडीची लाट...

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील थंडीचा कडाका तीव्र होत असून पुन्हा एकदा किमान तापमानात मोठी घट होण्यास सुरुवात झाली आहे. याच कारणास्तव पुढील ४८ तासांत ही लाट अधिक तीव्र होणार असून प्रामुख्याने पुणे अहिल्यानगर, नाशिक ,जळगाव, नंदुरबार, धुळे येथील किमान तापमान तीन ते चार अंशाने घसरेल असा अंदाज हवामान शास्त्रज्ञांनी वर्तवला आहे. इतकंच नव्हे तर काही भागात पारा सात ते आठ अंशापर्यंत खाली येण्याची शक्यता असल्यानं राज्यात थंडीची लाट आणखी तीव्र होणार असल्याचं म्हटलं जात आहे. मागील २४ तासांत उत्तर महाराष्ट्रात थंडीची कडाक्याची लाट आली असून , नाशिक जिल्ह्यात मंगळवारी किमान तापमान १०.३ अंशांवर होतं तर महाबळेश्वरमध्ये हा आकडा १२ अंशांवर होता.

# नागपुरातील 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर यांच्या 350 व्या शहीदी समागम' कार्यक्रमाचा राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडून आढावा

मुंबई । प्रतिनिधी

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त राज्य शासनातर्फे नागपूर, नवी मुंबई आणि नांदेड येथे भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. नागपूरमध्ये ७ डिसेंबर रोजी होणाऱ्या मुख्य कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णु देव सहाय उपस्थित राहणार आहेत.

या पार्श्वभूमीवर नागपूर आणि अमरावती विभागातील सुरू असलेल्या विविध कार्यक्रम, प्रचार उपक्रम व व्यवस्थापनाची अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आढावा बैठक घेतली. राज्यमंत्री



मिसाळ यांनी सांगितले की, प्रभातफेरी, वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा, रथयात्रा अशा विविध जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून गावोगावी आणि समाजातील सर्व स्तरांपर्यंत कार्यक्रमाची माहिती पोहोचवण्यात यावी. कार्यक्रमाला राज्यासह देशभरातून सुमारे तीन लाख भाविकांची उपस्थिती अपेक्षित असल्याने त्यांच्या निवास, भोजन, वाहतूक व सुरक्षेच्या तयारीचा देखील त्यांनी सविस्तर आढावा घेतला.

राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक यांनी सांगितले की, समितीच्या संकेतस्थळावर तसेच पत्रकांवर क्यूआर कोड स्कॅनरची सुविधा देण्यात आली असून, त्याद्वारे कार्यक्रमाची सर्व माहिती,


दैनिक मराठवाडा पत्र दि. ३०/११/२०२५

**कागदपत्रे हरवले हरवले आहेत.**

विकास गिन्यादेव राठोड या नावाचे इयत्ता १२ वी चे कागदपत्रे पुणे ते वडवणी प्रवासात हरवले आहेत.
सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
संपर्क : ९०७५७६७६७७



## मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 29/11/2025

अर्जदार : प्रियदर्शनी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. परळी, जैन कॉम्प्लेक्स, मोंढा मार्केट, ता. परळी जि. बीड

**विरूद्ध — गैरअर्जदार**

1) लवाद अर्ज क्र. 01/2025 व 02/2025 1) जोशी नकुल नंदकिशोर 2) जोशी नंदकिशोर जगन्नाथ 3) जोशी वालीबाई नंदकिशोर सर्व रा. हितकर टी हाऊस जवळ, स्टेशन रोड, परळी वै ता. परळी वै जि. बीड

2) लवाद अर्ज क्र. 03/2025 व 04/2025 1) जोशी नंदकिशोर जगन्नाथ 2) जोशी नकुल नंदकिशोर 3) जोशी वालीबाई नंदकिशोर सर्व रा. हितकर टी हाऊस जवळ, स्टेशन रोड, परळी वै ता. परळी वै जि. बीड

3) क्र. 05/2025 1) जाधव बापुराव धोंडीराम रा. रेहाणा मस्जिद जवळ, बसवेश्वर कॉलनी, परळी वै जि. बीड 2) चव्हाण विजयकुमार मोकिंदा रा. व्यंकटेश नगर, गंगाखेड जि. परभणी 3) मुगळे करबसअप्पा शंकरराव रा. खडकपुरा, गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी

4) लवाद अर्ज क्र. 06/2025 1) डापकर महादेव उर्फ माधव हरिभाऊ रा. बेलंबा ता. परळी वै जि. बीड 2) गिरी दत्तात्रय अवधुतराव रा. संगम ता. परळी वै. जि. बीड 3) गायकवाड रत्नेश्वर नामदेव रा. गांधी मार्केट, परळी वै. ता. परळी वै. जि. बीड

( टीप : वरील प्रत्येक लवाद अर्जामध्ये क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपणा पैकी काहींनी घेऊन गैरहजर राहिलात. काहींनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 17/12/2025 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही, असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांनिशी दिली आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.



## जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १७६२ / २०२५
CNR No. MHBI020000384720 25
शांताबाई सुग्रीव रसाळ व ईतर ४ वि. निरंक

अर्जदार :१. शांताबाई भ्र. सुग्रीव रसाळ, वय–४७ वर्षे, धंदा–घरकाम व शेती, रा. मांजरसुंबा ता. जि. बीड, २. सुरज पि सुग्रीव रसाळ, वय–२० वर्षे, धंदा–शिक्षण व व्यापार, रा. वरील प्रमाणे, ३. श्वेताली पि. सुग्रीव रसाळ, वय–२५ वर्षे, धंदा–शिक्षण, रा. वरील प्रमाणे, ४. स्वप्नाली पि. सुग्रीव रसाळ, वय–३० वर्षे, धंदा–शिक्षण, रा. वरील प्रमाणे ५. लक्ष्मीबाई भ्र. यशवंतराव रसाळ, वय ७५ वर्षे, धंदा– घरकाम, रा. वरील प्रमाणे रा. बीड मामला, मोमीनपुरा, बीड ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते ५ यांनी या न्यायालयात सुग्रीव यशवंतराव रसाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत सुग्रीव यशवंतराव रसाळ यांचा मृत्यु दिनांक २८/१०/२०२५ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे व अर्जदार क. ३ व ४ या मयताच्या मुली आहेत. आणि अर्जदार क. ५ ही मयताची आई आहे. तसेच मयताची वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयंत सुग्रीव यशवंतराव रसाळ यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. प्रकरणातील पुढील तारीख ०३/०१/२०२६

आज दिनांक २६ माहे नोव्हेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. (मार्फत ॲड. एम. के. पोकळे)

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर बीड



## DRAFT NOTICE/SUMMONS

**IN THE COURT OF THE III ADDL, SENIOR CIVIL JUDGE AND MACT, VIJAYAPUR, AT: VIJAYAPUR**
**MVC No.1352/2023.**

Petitioner.- 1) Raju S/o Laxman Bandiwaddar
V/s.
Respondents.- 1) Gyanadev and another
To,
Opponent/Respondent No. 1-
Gyanadev S/o Shamarao Bhalekar
Age: Major, Occ.: Agriculture,
R/o. Sambhajinagar, At/Post: Tirthpuri,
Tq. Ghanswangi Jalna, MH-431209

**NOTICE U/O V RULE 20(A) OF C.P.C.**

WHEREAS, the petitioner has filed this claim petition on account of damage to petitioner's vehicle in road traffic accident and your vehicle is involved in the accident its Mahindra Arjun. Tractor bearing No.MH-32/TAE-0342. So, you have been made as respondent No.1 in this case and your appearance is necessary and required. Hence your appearance is fixed on 02-02-2026 at about 10.30 AM, so appear in person or through advocate convergent with the all the facts and answer the same with relevant documents, if in case failing to do so the case will be heard and decided ex-parte.

On this day of 03-12--2025.
Given my hand and seal of the Court.
Place: Vijayapur
Date: 03/12/2025. stamp

(S.K. Ankalagi)
Advocate for petitioner.

By order of the Court
Senior Sheriatedar (Adm)
RL SR CJ & CM COURT

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरुवार, दि. ०४ डिसेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये संविधानाचा जागर कार्यक्रम



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये शासनाच्या परिपत्रकानुसार जागरण संविधानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक श्री. पुरुषोत्तम स्वामी समाज कल्याण विभाग बीड, बार्टी श्री. ढगे यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील मूलभूत हक्क, कर्तव्य याची सविस्तर माहिती सांगितली. भारतीय संविधान दस्ताऐवज नाही. तर तो जीवन जगण्याचा मार्ग आहे. संविधानाची मूल्ये स्वातंत्र्य समता, बंधुता, न्याय हे प्रत्येकाने आचरणात आणले पाहिजे असे सांगितले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शासनाच्या प्रतिनिधींच्या माध्यमातून भारतीय संविधानाविषयी जागृती घडविली. विद्यार्थ्यांनी यामध्ये स्वेच्छेने सहभागी होऊन उपक्रम यशस्वी केला याबद्दल प्राचार्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. मान्यवरांच्या हस्ते शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती होण्यासाठी महाविद्यालयामध्ये बसविण्यात आलेल्या फलकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विचारमंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन व आभार प्रा. नागोराव वाघमारे यांनी केले.

# केज, अंबाजोगाई तालुक्यातील सर्वच साखर कारखाने 2800/-पहिली उचल देण्यास तयार

### तहसीलदार राकेश गीड्डे ,पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मध्यस्थीने चक्का जाम आंदोलन स्थगित

**केज । प्रतिनिधी**

केज ,अंबाजोगाई तालुक्यातील अंबा सहकारी साखर कारखाना, येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्ट आनंदगाव (सा.)गंगा माऊली शुगर उमरी, केज या कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना यावर्षी विनाकपात ३०००/- रुपये पहिली उचल देण्याची मागणी करत केज च्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने आज दि.३ डिसेंबर रोजी बेमुदत चक्काजाम आंदोलन पुकारले होते आंदोलनाच्या धास्तीने पोलीस प्रशासन व तहसीलदार,केज यांच्या मध्यस्थीने साखर कारखानदारांचे शेतकी प्रतिनिधी व आंदोलक शेतकरी नेते ,पदाधिकारी यांची आज दि.३डिसेंबर रोजी केज



तहसील कार्यालयात संयुक्त बैठक घेण्यात आली या बैठकीला तहसीलदार राकेश गीड्डे , केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उणवणे, गंगा माऊली शुगरचे शेतकी अधिकारी श्री.अदनाक , अंबा साखर शेतकी अधिकारी श्री. शिंदे येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्ट चे श्री.पाटील शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट ,क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे , शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती कमिटीचे सदस्य भाई मोहन गुंड व आंदोलक शेतकरी यांची संयुक्त बैठक संपन्न झाली या बैठकीत ऊस दरासंदर्भात अनेक चर्चांच्या फेऱ्या झाल्या शेवटी सर्व साखर कारखान्यांनी यावर्षी गाळप ▶▶ उर्वरित पान २ वर

### फुस लावुन पळवलेल्या अल्पवयीन मूलीच्या शोधासाठी आईचे आष्टी तहसील समोर अमरण उपोषण, मुख्यमंत्री साहेब तुमच्या लाडक्या बहिणीला न्याय कोण देणार ?

# अंभोरा पोलिस राजकीय दबावाखाली; तीन महिने झाले तरी 'त्या अल्पवयीन' मुलीचा शोध लागेना

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीतील एका गावातील व धानोरा येथील एका कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इयत्ता बारावी मध्ये शिकत असलेली अल्पवयीन मुलगी फुस लावून पळवून नेली. या घटनेला तीन महिने झाले तरीही अंभोरा पोलिसांना 'त्या' अल्पवयीन मुलीचा शोध लावता आलेला नाही. त्यामुळे मुलीची आई व नातेवाईकांनी रीतसर गुन्हा दाखल केल्यानंतरही तसेच




**● आष्टी तालुक्यात दिवसेंदिवस मुलींच्या छेडछाडीचे प्रकार वाढत असल्याचे दिसून येत आहे तसेच रोड रोमिओने सुद्धा महाविद्यालयीन परिसरात धुमाकूळ घातलेला आहे. याकडे आष्टी व आंभोरा पोलिसांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष दिसून येत असल्याने वरील प्रकारच्या घटना कारणीभूत ठरत आहेत.त्यासाठी अंभोरा पोलिसांनी महाविद्यालय परिसरात गस्त घालण्याची मागणी पालकातून होत आहे.**

उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार व पोलीस अधीक्षक यांना भेटून निवेदन दिले. तरीही अद्याप पर्यंत मुलीचा शोध लागला नाही. मुलीचा पोलीसांनी शोध घ्यावा यासाठी मुलीची आई व नातेवाईकांनी तहसील कार्यालय आष्टी येथे दि १ डिसेंबर रोजी पासून आमरण उपोषणाला सुरू केले आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# ऊसाला प्रतिटन ४०००/- रुपये दर मिळावा

### बीड जिल्हा समाजवादी पार्टीच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

जिल्ह्यात साखर कारखान्याचे साइटवर जाऊन शेतकरी संघटना आणि शेतकरी गेल्या अनेक दिवसापासुन ऊसाला प्रतिटन चार हजार रूपये भाव घोषीत करणेबाबत अंदोलन करीत आहेत. कारखाना साइटवर आंदोलन मोठ्या प्रमाणात चालू आहे. या आंदोलनाला समाजवादी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने पाठिंबा देत मुख्यमंत्र्यांना उपजिल्हा अधीकारी अंबाजोगाई यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले. ऊसाला नीचांकी भाव मिळत असून किमान ४००० रुपये प्रति टन भाव मिळावा यासाठी शेतकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत. अनेक दिवसापासून



शेतकरी बीड जिल्ह्यातील सहकार्याने खाजगी तत्त्वावरील प्रत्येक कारखान्यात जावुन या दराबाबत मागणी करत आहेत. संबंधित साखर कारखान्याचे एम डी, कारखान्याचे चेअरमन आणि संचालक यांना निवेदन देत शांततेत शेतकरी आंदोलन करत आहेत. समाजवादी पार्टी बीड जिल्हा यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी शेतक-याच्या ऊसाला प्रती टन ४०००/- रुपये भाव घोषीत करण्यात यावा यासाठी समीतीच्या वतीने निवेदन देण्यात आले आहेत. मात्र अध्याप पर्यंत कोणत्याही ▶▶ उर्वरित पान २ वर

### बार्टीच्या वतीने नारदस्वामी माध्यमिक विद्यालय MIDC बीड येथे संविधान दिन व जागतिक अपंग दिन निमित्त कार्यक्रम



**बीड । प्रतिनिधी**

बार्टीच्या वतीने नारदस्वामी माध्यमिक विद्यालय बीड येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले व कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रथमता महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून नंतर अभिवादन करण्यात आले व प्रमुख पाहुणे आणि विद्यार्थ्यांना मुलांना व मुलींना उद्देशिकाचे वाचन करून घेण्यात आले नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्री. पाखरे एस.एस.सर मुख्याध्यापक व कार्यक्रमाचे संयोजक सिरसट व्हि. ए. सर व बार्टीचे महाराष्ट्राचे आयोजक महासंचालक माननीय सुनील वारे साहेब व समाज कल्याण कार्यालयाचे सचिव डॉक्टर हर्षदीप कांबळे साहेब बार्टीचे विभाग प्रमुख डॉक्टर बबन जोगदंड साहेब जिल्हा प्रकल्प ▶▶ उर्वरित पान २ वर

### दिव्यांगाचे सामाजिक, शैक्षणिक व अर्थिक हितासाठी शासकीय योजनांची काटेकोरपणे अमलबजावणी करणार : जितीन रहमान

**बीड । प्रतिनिधी**

३ डिसेंबर हा दिवस जागतिक दिव्यांग दिन म्हणून संपूर्ण जगभरात साजरा केला जातो. या वर्षी जागतिक दिव्यांग दिनाची थिम सामाजिक प्रगतीसाठी दिव्यांग सर्व समावेशक समाज घडविणे अशी आहे. बीड जिल्हा परिषदेच्या जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयामार्फत जागतिक दिव्यांग दिना निमित्त मुख्य प्रशासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



बीड जिल्ह्यातील दिव्यांगासाठी काम करणाऱ्या संघटना, स्वयंसेवी संस्था, दिव्यांग शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्यासह दिव्यांग बंधुभगीनी मुख्य कार्यक्रमास हजर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद बीड श्रीम. प्रियाराणी पाटील यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी दिव्यांग शाळांबद्दल तसेच शासकीय योजनांबद्दल सविस्तर माहिती दिली. दिव्यांग दिना निमित्त कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. सतिष लड्डा ▶▶ उर्वरित पान २ वर

### पात्र व्यक्तींनी इस्राईलला जाण्यासाठी संकेत स्थळावर नोंदणी करावी

**बीड । प्रतिनिधी**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत इस्राईल देशात Renovation Construction रोजगाराची संधी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने (E-C) राज्यामध्ये जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याची शिफारस केली आहे, जेणेकरून महाराष्ट्र राज्य १ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे यशस्वी वाटचाल करू शकेल. यामध्ये आतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासह बांधकाम, आरोग्य व इतर क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात आला आहे. यासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी, एक असलेल्या इस्राईल आणि भारत यांच्यातील कराराद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण करणे, या अंतर्गत इस्राईल देशात Henovation Construction या क्षेत्रात खालीलप्रमाणे नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. . Plastering Work (१००० जागा) २. Ceramic Tiling (१००० जागा) ३. Drywall Worker (३०० जागा) ४. Mason (३०० जागा) त्या करिता पात्रता निकष पुढील प्रमाणे आहेत. ▶▶ उर्वरित पान २ वर

# लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात चक्रवर्ती महाराजा यशवंतराव होळकर जयंती साजरी

### इंग्रजांविरुद्ध सलग १८ युद्धे अपराजित राहिलेले चक्रवर्ती :डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.३ डिसेंबर बुधवार रोजी चक्रवर्ती महाराजा यशवंतराव होळकर यांच्या २४९ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब



जाधव होते. तर प्रमुख उपस्थितीत माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ आप्पा गिरे,उपसरपंच बाळकृष्ण थोरात,माजी उपसरपंच शंकर वाणी, सुरेश निर्मळ,रामकिसन गिरे, संदिप मुळे, संजय घोलप, संतोष भोसले,शहादेव धलपे, रामदास मुळे, ▶▶ उर्वरित पान २ वर

# शेतकऱ्यांच्या उसदरवाढीसाठीचे आमरण उपोषणाला स्थगिती

**बीड । प्रतिनिधी**

केज, अंबाजोगाई मधिल सर्वच साखर कारखाने पहिली उचल २८००/- रु देण्यास तयार तहसीलदार साहेब यांच्या मदतीने स्थगित आजचे आमरण उपोषण निवेदन देऊन स्थगित केले शेतकऱ्यांच्या उसाला तीन हजार रुपये भाव देण्यात यावा व चार हजार रुपये या मागणीसाठी केज तहसील कार्यालय येथे आमरण उपोषणाचे निवेदन एक डिसेंबरला दिले होते



तरी आज तीन डिसेंबर रोजी अमरण उपोषणाला सुरुवात करण्यात येणार होती परंतु केज ,अंबाजोगाई मधिल सर्वच साखर कारखाने पहिली उचल २८००/- रु देण्यास तयार ▶▶ उर्वरित पान २ वर

# उसाचा दर जाहीर, शेतकरी एकजूटीचा विजय : राजेंद्र आमटे

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव मधून सुरू झालेलं ऊस भाववाढ आंदोलन आज हे बीड जिल्हा व संपूर्ण मराठवाड्यात पेटले. माजलगाव तालुक्यातील संपूर्ण युवा शेतकरी संघर्ष समितीच्या तरुण युवकांनी संघर्ष करत २४०० रु. पहिला हप्ता देऊ म्हणणारे कारखानदार हे पहिला हप्ता २७७५ रु.देण्यास तयार झाले असून हा शेतकरी एकजुटीचा विजयी असल्याचे मत शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाप्रमुख राजेंद्र आमटे यांनी व्यक्त केले.

माजलगाव तालुक्यातील ऊस भाववाढ आंदोलनाला पाठिंबा देत बीड जिल्ह्यातील संपूर्ण शेतकरी हा माजलगाव मधील आंदोलनकर्त्या



पोरांच्या पाठीमागे उभा राहिला. बीड तालुक्यातील पिंपळनेर परिसरात बेडकुचीवाडी, सांडरवन, लिंबारूई, कुर्ला, आहेर चिंचोली, रंजेगाव , मुग्गाव, पाटेगाव, पिंपळादेवी, सुर्डि, तांदळवाडी, नांदुर, खामगाव, येतील शेतकरी हा या आंदोलनात सहभागी झाला अनेक ठिकाणी बीड मधील पिंपळनेर परिसरात, आहेर चिंचोली परिसरातील शेतकरी हा माजलगाव मधील आंदोलनात सहभागी झाला. वाढते आंदोलनच लोन पाहता कारखानदार व शेतकरी पुत्र यांच्या मध्ये बैठका झाल्या व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बजरंग सोनवणे यांच्या येडेश्वरी कारखाना २८०० ▶▶ उर्वरित पान २ वर

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करून वही पेन दान करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या ६५ व्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करून महामानव अभिवादन ग्रुपने गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना वर्षभर वाटप करण्याकरिता वही - पेन (शालेय साहित्य)किंवा रोख रकमेचे दान देण्याकरिता फुले - शाहू आंबेडकर विचारसरणीच्या उपासक उपासिकांना व सर्व थरातील दानदात्यांना आवाहन केले होते. गेली ४ वर्षे बीडवासिय आणि बीड बाहेर वास्तव्य करणाऱ्यांनी भरघोस सहाय्य केले होते.त्या मिळालेल्या दानातून ६ डिसेंबर २०२४ ते २९ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ११९७ गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) वाटप केले. तरी यावर्षी देखील ६ डिसेंबर २०२५ रोजी ▶▶ उर्वरित पान २ वर